# —: जाहिर निविदा :—

जिल्हा न्यायालय अहमदनगर यांचे अधिपत्याखाली नव्याने स्थापन झालेले राजुर येथिल दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, राजुर ता. अकोले जि. अहमदनगर व दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगर तसेच संभाव्य राहाता येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, राहाता ता. राहाता जि. अहमदनगर या न्यायालयाकरिता पाच राजमुद्रा खरेदी करण्यासाठी स्थानिक बाजारपेठेतुन अधिकृत विक्री करणा—या विक्रेत्यांकडून दरपत्रक मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

४. आपल्या वस्तुचे दरपत्रक सिलबद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

७. दरपत्रकात एकच पत्ता लिहिलेले दोन दरपत्रके नसावे.

८. सिलबद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.

९. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

१०. सदरहु दरपत्रक दिनांक २२/१२/२०२३ रोजी सायकाळी ०६—०० पर्यत देणे आवश्यक आहे.

११. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.

१२. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर याचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१३. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१४. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक शनिवार दिनांक २२/१२/२०२३ रोजी सायकाळी ०६—०० पर्यत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर याचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

सहाय्यक अधिक्षक,<br>
लेखा व वित्त विभाग,<br>
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर<br>
दिनांक :— १५/१२/२०२३

प्रत :—

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,<br>
२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर<br>
३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर<br>
४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर<br>
५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट

D \DC Account PC Backup\D Drive\Shripad\DARAPATRAK YADI 2023-2024 Jahir Nivida.odt